वनवर्धन बिल्डींग, ताराबाई पार्क, कोल्हापूर येथे ३० कि.वॅ. क्षमतेचे पारेषण संलग्न सौर विद्युत संच (रुफ टॉप), नक्तमापन पध्दतीने आस्थापित करण्याबाबतच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण:-२०१७/प्र.क्र.२३७/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १४ नोव्हेंबर, २०१७

वाचा :-

१. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष २४(३)/प्र.क्र.५६/१८४/२०१७-१८, दिनांक ०९.०६.२०१७.

प्रस्तावना:-

वनवर्धन बिल्डींग, ताराबाई पार्क, कोल्हापूर येथे ३० कि. वॅ. क्षमतेचे पारेषण संलग्न सौर विद्युत संच (रुफ टॉप), नक्तमापन आस्थापित करण्याकरीता आवश्यक असलेल्या बाबी विचारात घेऊन महाव्यवस्थापक, महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा), पुणे यांनी त्या कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास त्यांनी तांत्रिक मंजुरी प्रदान करुन सदर कामाचे अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता देण्याबाबत संदर्भाधिन क्र.१ च्या पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रस्ताव सादर करुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत शिफारशीसह विनंती केली आहे. त्यानुसार या कामासाठी रू.३०,४०,०००/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

वनवर्धन बिल्डींग, ताराबाई पार्क, कोल्हापूर येथे ३० कि. वॅ. क्षमतेचे पारेषण संलग्न सौर विद्युत संच (रुफ टॉप), नक्तमापन आस्थापित करण्याकरीता आवश्यक असलेल्या बाबी विचारात घेऊन महाव्यवस्थापक, महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा), पुणे यांनी तयार केलेल्या रु.३०,४०,०००/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या सहमतीस व खालील अटींच्या अधीन राहून शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

१. प्रस्तुत प्रस्तावासोबतच्या अंदाजपत्रकामध्ये ढोबळ तरतूदी केलेल्या असल्याने काम हाती घेण्यापूर्वी प्रस्तुत कामाचे सविस्तर दरपृथ:करणे तयार करुन त्यास अधिक्षक अभियंता (विद्युत) सार्वजनिक बांधकाम यांची मंजूरी घेवून शासनास सादर केलेल्या प्रस्तावा सोबत ठेवण्यात यावीत व त्याप्रमाणे सविस्तर अंदाजपत्रक तयार करावे.

२. काम करण्यापूर्वी जागेच्या मालकीबाबत खात्री करावी.

३. प्रस्तुत अंदाजपत्रकावर अधिक्षक अभियंता (विद्युत) सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे व कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांची स्वाक्षरी घ्यावी.

४. सदर बांधकामाच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्र.बीडीजी-२०१४/प्र.क्र. ९६/इमा-३, दिनांक ८.७.२०१४ मधील कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

५. प्रत्यक्ष काम करते वेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही/२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१, दि. १० जानेवारी २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

६. सदरहू कामे करतांना वन(संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत तरतूद तसेच प्रचलित कायदे / नियम संदर्भाधिन तरतूदींचा भंग होणार नाही. तसेच कोणतीही अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

हे आदेश शासन निर्णय वित्त विभाग, क्र. विअप्र १०.०८/प्र.क्र.७०/२००८/ विनियम, दिनांक १५ मे, २००९, वित्तीय अधिनियम नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग-पाच नुसार महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका अंतर्गत प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार, अ.क्र. १, परिच्छेद क्र. १३४ नुसार विभागास असलेल्या वित्तीय अधिकारानुसार व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या सहमतीने, निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११४१५४७३९२२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2017.11.14 15:50:47 +05'30'

(वीरेंद्र तिवारी)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर

२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर .
४. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
५. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत-३), मंत्रालय, मुंबई-३२.
६. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
७. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
८. फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)